# Library & Information Centre

## GIT in NEWS

**Tarun Bharat 22-03-2016**

### जीआयटीतर्फे आज जलदिनानिमित्त कार्यक्रम

**बेळगाव :** केएलएस संचालित गोगटे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचा सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग, कर्नाटक राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि कर्नाटक पाणी पुरवठा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. २२ रोजी जागतिक जलदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कॉलेजच्या रौप्य महोत्सवी सभागृहात सकाळी १० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून कर्नाटक राज्य कायदा सेवा प्राधिकरणाचे सचिव आणि वरिष्ठ न्यायाधीश किरण किणी उपस्थित राहणार आहेत. पर्यावरण अधिकारी जगदीश आय. एच., पाणीपुरवठा मंडळाचे कार्यकारी अभियंते एन. प्रसन्नमूर्ती, जीआयटी व्यवस्थापन मंडळाचे चेअरमन यु. एन. कालकुंद्रीकर आदींची उपस्थिती असणार असून केएलएसचे अध्यक्ष एम. आर. कुलकर्णी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत.

**Tarun Bharat 22-03-2016**

### जीआयटीमध्ये गेटचे सेंटर कार्यान्वित

प्रतिनिधी
बेळगाव

गेटच्या प्रशिक्षण केंद्रासाठी केएलएस संचालित गोगटे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने नुकताच एज्युटेकऑन सोल्युशन्स इंडिया प्रा. लि. या कंपनीशी समन्वय करार केला आहे. कॉलेज व्यवस्थापन मंडळाचे चेअरमन यु. एन. कालकुंद्रीकर व प्राचार्य डॉ. ए. एस. देशपांडे यांनी गेट इटीसी कंपनीचे सीईओ सिद्धार्थ बेन्नूर आणि सुभाष हेब्बाळकर यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.



**बेळगाव : समन्वय कराराप्रसंगी प्राचार्य डॉ. ए. एस. देशपांडे, यु. एन. कालकुंद्रीकर, सिद्धार्थ बेन्नूर, सुभाष हेब्बाळकर, प्रा. सतीश हुक्केरी.**

गेट ही एक ऑनलाईन परीक्षा आहे. नॅशनल को–ऑर्डिनेशन बोर्डच्या माध्यमातून इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स व सात आयआयटी ही परीक्षा घेतात. देशभरात केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून या परीक्षेचे नियंत्रण केले जाते. मागील वर्षी प्रा. सतीश हुक्केरी यांच्या मार्गदर्शनाखाली गेटअंतर्गत प्रशिक्षित विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमध्ये नोकऱ्यांची संधीही उपलब्ध झाली आहे.

# LIBRARY & INFORMATION CENTRE

## GIT in NEWS

**Sakaal 22-03-2016**



बेळगाव : करारावेळी कागदपत्रांचे हस्तांतरण करताना जीआयटीचे अध्यक्ष यू. एन. कालकुंद्रीकर. शेजारी एज्युकॉनचे सीईओ सिद्धार्थ बेन्नूर, प्रा. सतीश हुक्केरी, सुभाष हेब्बाळकर, जीआयटीचे प्राचार्य डॉ. ए. एस. देशपांडे.

# जीआयटीचा 'एज्युकॉन'शी करार कायम

बेळगाव, ता. २१ : गोगटे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने ग्रॅज्युएट ॲप्टिट्यूड टेस्ट इन इंजिनिअरिंगसंबंधी (गेट) प्रशिक्षणासाठी एज्युकॉन सोल्युशन्सशी सलग दुसऱ्या वर्षी करार केला आहे.

गतवर्षी झालेल्या करारांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची कामगिरी समाधानकारक राहिली. त्यामुळे यंदाही एज्युकॉनशी करार कायम ठेवण्याचा निर्णय जीआयटी व्यवस्थापनाने घेतला. जीआयटी कार्यकारिणीचे अध्यक्ष यू. एन. कालकुंद्रीकर, एज्युकॉनचे सीईओ सिद्धार्थ बेन्नूर, प्रा. सतीश हुक्केरी, सुभाष हेब्बाळकर, जीआयटीचे प्राचार्य डॉ. ए. एस. देशपांडे उपस्थित होते.

**Times of India 22-03-2016**

**Memorial lecture:** The civil engineering department of KLS GIT paid tribute to late SG Balekundri, one of the greatest civil engineers of Karnataka, on Friday at Silver Jubilee Auditorium.

# Library & Information Centre

## GIT in NEWS

**Deccan Herald 22-03-2016**



# KLS Gogte college pays tributes to Balekundri

**BELAGAVI, DHNS:** KLS Gogte Institute Technology (GIT), Department of Civil Engineering, paid tributes to S G Balekundri, one of the greatest civil engineers of the State recently.

GIT Department of Civil Engineering, as a tradition, has been organising Balekundri Memorial Lecture annually, where eminent personalities from the field of civil engineering are invited to deliver the lecture.

Vijaykumar Muttur, President, Pratibha Industries, Mumbai, enlightened the audience, which included civil engineering and architectural students, faculty members and many dignitaries about the precast construction method of high rise buildings.

He also introduced the audience to the present and latest construction technology in practice in India and worldwide. He spoke about the changes and rapid developments that have taken place in construction technology in recent years. Head of Department of Civil Engineering G S Manjunath, in his welcome address, informed the students about the various programmes and technical events being organised by the department. Prof Vikhayt Katti spoke about the illustrious career profile of S G Balekundri.